**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग-६ अ करिता)**

क्र.पोमसं/८-अ/उ.श्रे.ल.ले.-मुफसल/सार्व.बदल्या-२०१७/६५/२०१७ मुंबई दिनांक १२/०५/२०१७

**-: आदेश :-**

**(१)**

या कार्यालयाचे क्र. पोमसं/८-अ/उ.श्रे.ल.ले./पाटील/ बदली/२०/२०१७, दिनांक २३/०५/२०१६ अन्वये श्री सुरेश लक्ष्मण पाटील, उच्च श्रेणी लघुलेखक यांची अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयातून विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे या कार्यालयामध्ये बदली करण्यात आलेली आहे. सदरच्या आदेशामध्ये अंशत: बदल करण्यात येत असून श्री. सुरेश लक्ष्मण पाटील यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे कार्यालयाऐवजी विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, कोकण भवन, नवी मुंबई कार्यालयामध्ये बदली करण्यात येत आहेत.

**आदेश -(२)**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ अन्वये, आणि शासन अधिसूचना, गृह विभाग, क्र.टीआरएन-०३११/१३३५/प्र.क्र.-२९१/पोल-५ब, दि.२९/३/२०११ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार पोलीस महासंचालकांच्या मुफसल लिपिक संवर्गातील खालील नमुद उच्चश्रेणी लघुलेखकांची सध्याच्या कार्यालयामध्ये ३ वर्षे सेवा पुर्ण झाली असल्यामुळे त्यांची प्रशासकीय कारणांस्तव स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात बदली करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | उच्चश्रेणी लघुलेखक | सध्याचे नेमणुकीचे कार्यालय | बदलीनंतरचे नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीमती निलिमा नितीन खैनार | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे. | विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे. |
| २ | श्रीमती पूजा हेमंत महाजन | पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र १४, औरंगाबाद. |

२. उपरोक्त बदलीच्या आदेशांची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे :-

१. बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर पर्यायी उच्चश्रेणी लघुलेखक हजर होण्याची वाट न पाहता त्यांना बदली ठिकाणी हजर होण्यासाठी त्वरीत कार्यमुक्त करावे.
२. बदली झालेल्या, व कार्यमुक्त केलेल्या उच्चश्रेणी लघुलेखकांना विनाविलंब रुजु करुन घ्यावे, व त्याबाबतचा दिनांक हया कार्यालयास कळवावा. तसेच, त्यांना रुजु करुन न घेतल्यास सक्तीचा प्रतीक्षा काळ ठरवून काम न करता वेतन व भत्ते देण्याचा प्रश्न उद्‌भवल्यास संबंधीत घटक प्रमुखास जबाबदार धरण्यात येईल.
३. बदलीच्या आदेशांत बदल करुन घेण्यासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे उच्चश्रेणी लघुलेखक शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.
४. बदली झालेल्या उच्चश्रेणी लघुलेखकांनी त्यांची बदली केलेल्या कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे.
५. बदलीनंतर जे उच्चश्रेणी लघुलेखक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

३. सदरचे आदेश पोलीस महासंचालकांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति :

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र / रा.रा.पो.बल, पुणे
पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र १४ औरंगाबाद.

प्रत माहितीकरिता :

अपर पोलीस महासंचालक, rरारापोबल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १० व १२.

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष

२. सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

प्रत सविनय सादर,

महासंचालक, अेसीबी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**(अनुप कुमार सिंह)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे करीता.